दि. २८/११/२०२०.

प्रति,

मा. प्राचार्य,

तुळजाराम चतूरचंद कला, विज्ञान

ववाणिज्य महाविद्यालय, बारामती - ४१३१०२

विषय:- भारतीय संविधान दिन अहवाल.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये, आपणांस अहवाल सादर करतो की, गुरुवार दि.२६ नोव्हेंबर, २०२०. रोजी राज्यशास विभागाच्या वतीने "संविधान दिन" ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला होता. यावेळी "भारतीय संविधान आणि सद्य स्थिती" या विषयावर मा. प्राचार्य, डॉ.चंद्रशेखर मुरूमकर सर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानाचा प्रारंभ दु.२:२० वा. ऑनलाईन पध्दतीने करण्यात आले.

यावेळी ऑनलाइन व्याख्यानाचे संयोजक आणि राज्यशास्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. हनुमंत फाटक, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेलवे, महाविद्यालयाचे रजिस्टर श्री. अभिनंदन शहा स रउपस्थित होते. या व्याख्यानाला मोठया संख्येने विद्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते.

यावेळी संविधानाच्या उदेश पत्रिकेची शपथ प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकरसर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना देण्यात आली.

भारता सारख्या खंडप्राय देशातील सर्व समूहांना सामावून घेणारी राज्य घटना बनविणे अवघड होते. या देशांमध्ये जात, धर्म, भाषा, पंथ, प्रांत अशी विविधता आहे. त्या विविधतेला एकात्मतेत गुंफण्याचे काम भारतीय संविधानाने केले असे गौरवोद्गार प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर यांनी संविधान दिनाच्या निमित्ताने काढले.

२६ नोव्हेंबर, २०२० रोजी संविधान दिनाच्या निमित्ताने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर बोलत होते.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर म्हणाले की, भारतातील सर्व समूहांना सामावून घेण्यासाठी भारतीय राज्यघटनेने त्रिसूत्री व्यवस्था दिले आहे. भारतावर ब्रिटिशांनी राज्य करताना भारतीय समाजातील विविधतेचा अभ्यास केला. त्यामुळे ब्रिटिश आपल्यावार वर्चस्व ठेवू शकले. परंतु १९ व्या आणि २० व्या शतकात ब्रिटिश वसाहतवादी व्यवस्थेला विरोध सुरू झाला. १८८५ साली राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापने नंतर भारता मध्ये राजकीय आणि सामाजिक विचारांची देवाणघेवाण सुरू झाली. त्यामधून भारतीय समाजा मध्ये स्वातंत्र्याची अस्मिता निर्माण झाली. तर दुसऱ्या बाजूला पहिल्या महायुद्धा नंतर ब्रिटिशांना सुद्धा भारतावर राज्य करणे अवघड झाले.

महात्मा गांधी, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल यांनी एक समृद्ध समाज घडविण्यासाठी स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, धर्म निरपेक्षता, व्यक्ती स्वातंत्र्य या संकल्पनांचा आशय समजून घेणारा समाज अपेक्षित होता. हा समाज फक्त भारतीय संविधाना मधून घडू शकतो. असे मत प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर यांनी यावेळी व्यक्त केले.

भारत स्वतंत्रहोण्याच्या अगोदर जवळ जवळ चाळीस वर्ष राज्य घटना निर्मितीची प्रक्रिया सुरू झाली होती. भारताने संघराज्य शासन प्रणालीचा स्वीकार करून कार्यकारी मंडळ, कायदे मंडळ आणि न्याय मंडळाची निर्मिती करून त्यांची परस्परांवर नियंत्रणाची सांगड घातली आहे. राज्य घटनाकारांनी घटना लिहिताना इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, स्वित्झर्लंड अशा विविध देशातील राज्यघटनाचा अभ्यास केला. त्या देशाच्या राज्यघटना मधील सर्वोत्तम गोष्टींचा स्वीकार केला.

प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर पुढे म्हणाले की, भारतीय संविधाना मध्ये पाश्चिमात्य आधुनिक उदारमतवादी विचारा बरोबर भारतातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक मूल्यांचा स्वीकार केला. भारतीय राज्यघटनेचे हे वेगळे पण आहे की, राज्यघटनेने भारतीय नागरिकांना मुलभूत हक्कां बरोबर मूलभूत कर्तव्याची सुद्धा जाणीव करून दिली आहे.

आपल्या देशातील प्रत्येक व्यक्तीने राज्य घटनेप्रमाणे अचारण करणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकांने सामाजिक बांधिलकीतून वागले पाहिजे. राज्यघटनाकारांना हे अपेक्षित होते. परंतु आज आपण जात, धर्म, पंथ, भाषा, प्रांत, गट या मध्ये वाटलो जात आहे की काय? याचा सुद्धा विचार करण्याची गरज आहे. असे मत प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर यांनी यावेळी व्यक्त केले.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

यावेळी संविधानाच्या उदेश पत्रिकेची शपथ प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना देण्यात आली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कैलास मांटे यांनी केले. तर आभार प्रा. राजू पांडे यांनी मांडले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर, उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप सर, डॉ. अजित तेलवे सर, श्री. अभिनंदन शहा सर यांनी मार्गदर्शन आणि सहकार्य केले.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

HOD
Department of Political Science
Tuljaram Chaturchand College
Baramati 413102

दि. २६नोव्हेंबर२०२०रोजीभारतीयसंविधानदिनाचेफोटो







डॉ हनुमंत फाटक
राज्यशास्र विभाग प्रमुख

TULJARAM CHATURCHAND COLLEGE ★ BARAMATI

**HOD**
**Department of Political Science**
**Tuljaram Chaturchand College**
**Baramati 413102**